माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनोलैंगिकता विकास कृतिकार्यक्रमाचे विकसन व त्याची परिणामकारकता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या
आंतरविदयाशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत शिक्षणशास्त्र
विषयात विद्यावाचस्पती पदवीच्या अंशतः
पूर्ततेसाठी सादर केलेला
संशोधन आराखडा

संशोधक
वनिता चंद्रभान दयाटे

मार्गदर्शक
डॉ.वनिता देवदास रामटेके

शिक्षणशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

डिसेंबर २०२४

माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनोलैंगिकता विकास कृतिकार्यक्रमाचे विकसन व त्याची परिणामकारकता

प्रस्तावना:

मानवी संस्कृतीच्या उषःकालापासून किशोर अवस्थेला महत्त्व देण्यात आलेले आहे. किशोरावस्था ही मानवी जीवनातील शारीरिक आणि मानसिक विकासातील अत्यंत वेगवान आणि महत्त्वाचा टप्पा होय. या अवस्थेत मानसिक विकासापेक्षा शारीरिक वाढ अधिक वेगाने होते. हा मानवाच्या आयुष्यातील अत्यंत संवेदनशील कालखंड असतो. या कालावधीत घडणाऱ्या सर्वच चांगल्या वाईट घटनांचा मनावर परिणाम होत असतो. सभोवतालचे वातावरण, सहवासातील व्यक्ती या दोन्हींचाही या वयातील वाढ आणि विकासावर परिणाम होत असतो. नुकतेच किशोरावस्थेत प्रवेश केलेल्या मुला-मुलींमध्ये भरकटण्याचा धोका अधिक असतो कारण त्यांच्या पूर्ण क्षमतांचा विकास झालेला नसतो. कुटुंबातील मोठ्या माणसांचे न ऐकण्याचा बंडखोरपणा वाढलेला असतो, अरेरावी वाढलेली दिसते. या कालावधीत मानसिक आरोग्यावर झालेल्या बदलांचा परिणाम हा दिर्घकाळ टिकू शकतो, त्यांच्या जीवनशैलीवर देखील याचा परिणाम होतो. म्हणूनच किशोरावस्थेला ही जीवनातील महत्त्वाची "संभ्रमणावस्था" म्हणतात.

सिग्मंड फ्राईड म्हणतात कि स्वप्ने, आकांक्षा, इच्छा, चिंता गोष्टी मनात बसलेल्या असतात आणि मन मेंदूत. मेंदूत निर्माण होणाऱ्या तरल आणि अगम्य वाटणाऱ्या भाव, भावना, विचार यांचे स्वरूप हळूहळू कळेल. ही ब्रूक यांची संकल्पना त्यांना पटली आणि त्यांनी मेंदूचा अधिक सखोल अभ्यास केला.

लिंगभाव, लैंगिकता आणि कामजीवन याबद्दल फ्राईड यांनी केलेले मूलगामी विवेचन यामुळे विचारी लोंकाना नवा दृष्टीकोन मिळाला. अनेक मानसिक

विकृतीच्या मुळाशी बालपणातील लैंगिक हिंसा, अत्याचार लैंगिक शोषणातून झालेले मनावरील आघात असतात असे फ्राईड यांना वाटते.

मानवी आयुष्यातला असा कालावधी की ज्यात त्यांच्या शारीरिक,मानसिक आरोग्याकडे, विकासाकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असते.उत्तम जीवनशैली अंगीकारण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान मिळवण्याचा, भावनिक समृद्ध होण्याचा तसेच परस्परांशी उत्तम नाते संबंध जोडण्यासाठी शिकण्याचा कालावधी म्हणजे किशोरावस्था होय.

जगभरातील वेगवेगळया संस्कृतीमध्ये लहानपणापासून तारुण्याकडे जाण्याच्या सर्वच टप्प्यांसाठी काहीना काही मार्गदर्शक तत्त्व मांडलेले आहेत. या टप्प्यातील मुला-मुलींची कशी काळजी घेतली गेली पाहिजे या विषयी सिग्मंड फ्राईड, विठ्ठल प्रभू या अभ्यासकांनी त्यांच्या साहित्यात वर्णन केलेले आहे. परंतु अजूनही काही देशांतील संस्कृतीमध्ये या किशोरावस्थेतील मुलामुलींना योग्य ते मार्गदर्शन केले जात नाही.

"बालपण व तारुण्य यांना जोडणारा महत्त्वपूर्ण दुवा म्हणजे किशोरावस्था. एक व्यक्ती म्हणून भावी आयुष्याची पायाभूत तयारी आणि जीवन संघर्षात पदार्पण करण्यासाठी शारीरिक, मानसिक व वैचारिक पाया निर्माण करण्याचा काळ. शरीरांतर्गत होणाऱ्या जैवरासायनिक परिवर्तनाबरोबरच कौटुंबिक व सामाजिक भान असलेला उद्याचा जबाबदार सामाजिक घटक घडविण्यासाठी किशोरांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला महत्त्व आहे.

आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयानुसार ११ ते १९ वयोगटाला किशोरवयीन गट संबोधण्यात आले आहे. आज समाजामध्ये जे चित्रपट व दूरदर्शन मालिकामधून प्रदर्शित होत आहे त्यातून हाताळला जाणाऱ्या लैंगिक संबंधाचा विषय हा किशोरवयीन बालकांच्या दृष्टिकोनातून पोषक नाही. पॉर्नोग्राफी ,ब्ल्यू फिल्म्स,

यामुळे किशोरांच्या भावना चाळवल्या सारख्या होतात व त्यामध्ये दाखवलेल्या कृती करण्यास ते आकर्षित होतात. किशोरावस्था ही धोका पत्करण्याचे वय म्हणून ओळखली जाते. याच वयात स्वतःमधील पुरुषत्व सिद्ध करण्यासाठी किशोरवयीन मुले व्यसनाच्या आहारी जातात व ताणतणाव निर्माण होऊन नैराश्य, न्यूनत्व,आत्मविश्वासाचा अभाव अशी नकारात्मकता किशोरांमध्ये वाढताना दिसते.

संशोधनाची गरज :

१. किशोरवयीन मुलामध्ये वाढत्या वयासोबत शारीरिक, मानसिक भावनिक बदल होत असतात त्यामुळे त्यांच्या मनात वैचारिक गोंधळ होतो. म्हणून त्यांना लैंगिकता शिक्षण देणे गरजेचे आहे.

२. किशोरावस्थेत भेडसावणाऱ्या समस्या संदर्भात मुले त्यांच्या पालकांशी व शिक्षकांशी मोकळेपणाने बोलत नाहीत. या वयात त्यांना मित्र जवळचे वाटते. परंतु त्यानांही त्याबाबत पुरेशी शास्त्रीय माहिती नसते म्हणून त्यांना पडणाऱ्या प्रश्नांचा गुंता सोडविणे गरजेचे वाटते.

३. प्रसार माध्यमातून, जाहिरातींमधून, युट्युबद्वारे त्यांचे व्ह्युज, लाइकस् वाढविण्यासाठी भरमसाठ जाहिराती केल्या जातात. त्यामधून अतिरंजित माहिती दिली जाते. अशा चुकीच्या व योग्य मानसशास्त्र न जाणता दिल्या जाणाऱ्या माहितीसह ही मुले समाजात वावरत असतात व त्यातूनच अनेक समस्या निर्माण होतात.

४. किशोरवयीन मुलांच्या मनोलैंगिकता विकासाची सद्यस्थिती जाणून घेऊन योग्य कृतिकार्यक्रमासह उपाययोजना करून त्यांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी योग्य मार्गदर्शन व समुपदेशन करून सदृढ, निकोप समाज निर्मितीसाठी भावी पिढी घडविणे गरजेचे वाटते.

संशोधनाचे महत्व :

१. किशोरवयीन मुलांचे मनोलैंगिक आरोग्य निरोगी राहावे यासाठी शालेय स्तरावर योग्य मार्गदर्शन करणे महत्वाचे वाटते. कारण आजची युवापिढी शालेय वर्गातूनच घडते म्हणून किशोरवयीन मुलांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करणे महत्वाचे वाटते.

२. किशोरवयीन मुलांमध्ये वाढत्या वयासोबत शारीरिक, मानसिक, भावनिक बदल होत असताना नव्याने निर्माण होणाऱ्या लैंगिक भावना व त्यांचा अर्थ न समजल्याने सद्यस्थितीत मुले गोंधळून गेलेली दिसून येतात.

३. किशोरवयीन मुलांमध्ये आत्मविश्वास योग्य निर्णयक्षमता व सकारात्मक सामाजिक व्यवहार, विकसित करणे महत्वाचे वाटते.

४. किशोरवयीन मुलांना पडलेल्या प्रश्नांचे योग्य उत्तर पालक व शिक्षकांकडून न मिळाल्याने ते समवयस्क मित्रांकडून व प्रसारमाध्यमातून आपल्या शंकाचे समाधान करण्याचा प्रयत्न करतात. परंतु प्रसार माध्यमातील बरीच माहिती ही विकृत, अशास्त्रीय व अतिरंजीत पद्धतीची असते. त्यातून अनेक समस्या निर्माण होतात म्हणून या वयात लैंगिकता शिक्षण देणे महत्वाचे वाटते.

५. किशोर अवस्थेतील मुलांची शारीरिक, भावनिक, मानसिक, सामाजिक पैलूंबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करून, त्यांना पडलेला प्रश्नांचे निरसन करत, सुसंस्कृत व सक्षम पिढी घडविणे महत्वाचे आहे.

समस्या विधान :

माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनोलैंगिकता विकास कृतिकार्यक्रमाचे विकसन व त्याची परिणामकारकता

कार्यात्मक व्याख्या:

१) छत्रपती संभाजीनगर:

महाराष्ट्र राज्यातील एकूण ३६ जिल्ह्यांपैकी छत्रपती संभाजीनगर एक जिल्हा आहे. त्यात एकूण ९ तालुके समाविष्ट आहेत. जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळा व इयत्ता ९ वीचे विद्यार्थी यांचा जिल्हा म्हणजे छत्रपती संभाजीनगर जिल्हा होय.

२) माध्यमिक शाळा :-

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील इयत्ता नववी व दहावीच्या वर्गाला शिक्षण देणारा माध्यमिक स्तर होय.

३) विद्यार्थी:

छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळेतील इयत्ता नववीच्या वर्गातील मुले म्हणजेच विद्यार्थी होय.

४) मनोलैंगिकता विकास–

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांची लैंगिक ओळख, लैगिकता, मानसिक, सामाजिक आणि जैविक दृष्टिकोनातून केलेल्या अभ्यास म्हणजे मनोलैगिकता विकास होय.

५) कृतिकार्यक्रम-

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या मनोलैंगिकता विकासासंदर्भात संशोधकाने तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला कार्यक्रम म्हणजे कृतिकार्यक्रम होय.

६) विकसन:-

विद्यार्थ्यांच्या मनोलैगिकता विकासाला योग्य वळण देण्यासाठी कृति कार्यक्रमाच्या माध्यमातून होणारी प्रगती म्हणजेच विकसन होय.

७) परिणामकारकता:-

विद्यार्थ्यांच्या मनोलैगिकता विकासासाठी संशोधकाने तयार केलेला कृति कार्यक्रमा पूर्वी व कृती कार्यक्रम राबविल्या नंतर आलेला विद्यार्थ्यामध्ये होणारा मापनीय बदल म्हणजे परिणामकारकता होय.

उद्दिष्टे:-

१) किशोरवयीन मुलांच्या मनोलैंगिकता विकासाचा शोध घेणे.

२) किशोरवयीन मुलांच्या मनोलैंगिकता वर्तन सवयींचा अभ्यास करणे.

३) किशोरवयीन मुलांच्या लैंगिकता शिक्षण जागरुकतेचा शोध घेणे.

४) किशोरवयीन मुलांच्या मनोलैंगिकता विकासावरील घटकांचा शोध घेणे.

५) किशोरवयीन मुलांच्या मनोलैंगिकता विकासाच्या परिणामांचा शोध घेणे.

गृहितके :-

१) कृती कार्यक्रमानंतर किशोरवयीन मुलांचे मनोलैंगिकतेविषयीचे ज्ञान सकारात्मकरीत्या वाढेल – Santrock, J.W. (2011), Adolescence. McGraw Hill.

२) कृती कार्यक्रमानंतर किशोरवयीन मुलांचा मनोलैंगिकतेविषयीचा दृष्टीकोन अधिक सकारात्म होईल – Hurlock, E.B. (1973) Ad olescent Development, Tata McGraw Hill.

३) कृती कार्यक्रमानंतर किशोरवयीन मुलांचा वर्तनामध्ये मनोलैंगिकतेबाबत आरोग्यदायी सुधारणा दिसून येईल – World Health Organization (2006) Sexuality Education for Adolescents. Geneva : WHO.

४) किशोरवयीन मुले न्युनगंडात जात आहेत आणि प्रेम न मिळालेले वाटत असल्याने इतर नातेसंबंध आणि वर्तणुकीशी संबधित समस्या उद्भवू शकतात – वाघेला, व्ही.जे. – २०२३ A Critical Study of Psycho-sexual problems & teenagers independent author..

संशोधनाची परिकल्पना:-

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनोलैंगिकता विकासावर तयार करण्यात आलेल्या कृतिकार्यक्रमाचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांवर होतो.

शून्य परिकल्पना

ग्रामीण व शहरी क्षेत्रभेदानुसार विद्यार्थ्यांच्या मनोलैंगिकता विकासामध्ये सार्थ फरक दिसून येत नाही.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

- **क्षेत्रव्याप्ती**

  प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेतील इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आहे.

- **आशयव्याप्ती**

प्रस्तुत संशोधन हे विद्यार्थ्यांच्या मानसिक, शारीरिक, भावनिक व बौद्धिक विकास व आरोग्य विषयक बाबींशी संबंधित आहे.

- **घटकव्याप्ती**

प्रस्तुत संशोधन हे इयत्ता नववी वर्गात शिकणाऱ्या मुलांचा मनोलैंगिकता विकास या घटका पुरते मर्यादित आहे.

- **नमुना व्याप्ती**

प्रस्तुत संशोधनामध्ये छत्रपती संभाजी नगर मधील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेतील जिल्हा परिषदेच्या शाळेतील इयत्ता नववी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संशोधनासाठी निवड करण्यात येईल.

- **कालव्याप्ती**

प्रस्तुत संशोधन कार्य शैक्षणिक वर्ष २०२५-२०२७ मध्ये पूर्ण करण्यात येईल.

संशोधनाची परिमर्यादा :

१) प्रस्तुत संशोधनामध्ये छत्रपती संभाजीनगर मधील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळेतील इयत्ता ९ वी वर्गात शिकणाऱ्या केवळ मुलांचा अभ्यास केला जाणार आहे.

२) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांचा समावेश केला जाईल.

क्षेत्र मर्यादा :-

१) प्रस्तुत संशोधन हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वी चे वर्ग असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांपुरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वी च्या वर्गात शिकत असलेल्या मुलांसाठीच आहे.

आशय मर्यादा :-

१) प्रस्तुत संशोधन हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वी च्या वर्गात शिकत असलेल्या किशोरवयीन मुलांचा मनोलैंगिकता विकास पुरतच मर्यादित आहे.

२) सदर संशोधनकार्याच्या माहिती संकलनासाठी वापरलेली प्रश्नावली हे साधन असून विद्यार्थ्यांच्या मनोलैंगिकता विकासासाठी स्वतंत्र कृतिकार्यक्रम राबविण्यात आला आहे.

घटक मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन हे किशोरवयीन मुलांच्या मनोलैंगिकता विकासासाठी मानसिक आरोग्य सामाजिक आरोग्य, लैंगिक आरोग्य या घटकांपुरतेच मर्यादित आहे.

काल मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन कार्य हे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ व २०२६-२७ या कालावधीत जाणार आहे.

संशोधन कार्यपद्धती:-

प्रस्तुत संशोधनात संशोधन उद्दिष्टानुसार सर्वेक्षण संशोधन पद्धती आणि प्रायोगिक संशोधन पद्धती या संशोधन पद्धतींची निवड करण्यात आली आहे. म्हणजेच सदर संशोधनासाठी मिश्र संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची अभिकल्प :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रयोग राबविण्यासाठी हि गट अभिकल्पाची निवड केलेली आहे. यामध्ये प्रथमतः प्रायोगिक गटांना पूर्व चाचणी

देण्यात येईल. पूर्व चाचणी भरून घेतल्यानंतर नियोजित उपक्रम राबविण्यात येतील. त्यानंतर उत्तर चाचणीव्दारे माहिती संकलित करण्यात येईल. हि सर्व प्रक्रिया गटांवर राबविण्यात येईल.

संशोधनाची जनसंख्या:-

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था छत्रपती संभाजीनगर अंतर्गत एकूण नऊ तालुके (वैजापुर, गंगापूर, पैठण, कन्नड, सोयगाव, फुलंब्री, खुलताबाद, सिल्लोड, छत्रपती संभाजीनगर) येतात. या नऊ तालुक्यात जिल्हा परिषद माध्यमिक शाळांची एकूण संख्या ५५ आहे. त्यात इयत्ता ९ वीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २३५७ इतकी आहे.

प्रस्तुत संशोधनाच्या जनसंख्येचा विचार करता अभ्यास क्षेत्रातील एकूण २३५७ विद्यार्थी संशोधनाची जनसंख्या आहे.

संशोधनाचा नमुना /न्यादर्श:-

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची निवड प्रस्तुत संशोधनासाठी सुगम यादृच्छिक पद्धतीच्या लॉटरी पद्धतीने करण्याचे निश्चित केले आहे. ज्यामध्ये संशोधक चिठ्ठ्या टाकून शाळांची किंवा प्रतिसादकांची निवड करणार आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेपैकी प्रत्येक तालुक्यातील ०५ जिल्हा परिषद माध्यमिक शाळा अशा एकूण ४५ शाळा निवडण्यात येणार आहेत. प्रत्येक जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतून नववीच्या वर्गातील १० विद्यार्थ्यांची निवड मिश्रित प्रश्नावली व मुलाखत अनुसूचीसाठी केली जाणार आहे. असे एकूण ४५० विद्यार्थी हा प्रस्तुत संशोधनाचा न्यादर्श असणार आहे.

माहिती संकलनाची साधने :

१) पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्रश्नावली (Pre Test & Post Test Questionnaire)

२) कृती कार्यक्रम रूपरेषा (Action Programme Module)

३) अभिप्राय पत्रक (Feedback Form)

संशोधनाची सांख्यिकीय साधने:-

संशोधकाला माहिती संकलन केल्यानंतर त्याचे अचूक विश्लेषण करण्यासाठी काही सांख्यिकीय साधनांचा वापर करावा लागतो. त्यामुळे अचूक निष्कर्ष प्राप्त होण्यास अडथळा येत नाही. सदर संशोधन कार्यासाठी खालील साधनांची निवड केलेली आहे.

१) सरासरी

२) प्रमाण विचलन

३) टि- चाचणी

संशोधनाचा कार्यवाही :-

१) प्रथम संबधित साहित्याचा आढावा व मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली समस्या निश्चित करण्यात जाईल.

२) समस्या व उद्दिष्टानुरूप नमुना कार्यपद्धती व प्रायोगिक अभिकल्प निश्चित करण्यात येईल.

३) संशोधन निर्मितीसाठी विद्यार्थ्यांसाठी शोधिका तयार करून विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रश्नावली तयार करण्यात येईल.

४) माहिती संकलन साधनांची चाचणी प्रमाणीकरणाचे प्रमाणीकरण करण्यात येईल.

५) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थांसाठी कृती कार्यक्रम निश्चित करण्यात येईल.

६) प्रायोगिक कार्यवाही व माहितीचे संकलन करण्यात येईल.

७) विद्यार्थ्यांचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी घेण्यात येईल.

८) संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात येईल.

९) मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली प्रकरण लिहून तपासून चुकांची दुरुस्ती केली जाईल.

१०) प्रबंधाची बांधणी करून प्रबंधावर मार्गदर्शकांची स्वाक्षरी घेऊन प्रबंधाच्या पाच प्रती विद्यापीठात सादर करण्यात येईल.

प्रकरणीकरण :

१) प्रस्तावना

२) संबधित संशोधनाचा व साहित्याचा आढावा

३) संशोधनाची कार्यपद्धती

४) माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

५) निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठीचे विषय

संशोधन कामाचे वेळापत्रक:-

१. संशोधन समस्या निवड-	डिसेंबर२०२४
२.प्रस्तावना व संबंधित साहित्याचा आढावा –	जून २०२५
३.संशोधन साधन निर्मिती-	डिसेंबर २०२५
४. माहिती संकलन करणे-	जून २०२६
५. माहितीचे विश्लेषण करणे-	डिसेंबर २०२६
६. निष्कर्ष व शिफारशी पूर्ण करणे-	जून २०२७
७. संशोधन अहवाल लेखन करणे-	डिसेंबर २०२७
८. सादरीकरण -	जून २०२८

संशोधनाचे अंदाजपत्रक:-

१) संशोधन समस्या निश्चिती व प्राथमिक माहिती	१००००/-
२)क्षेत्रभेटी.	४५०००/-
३) माहिती संकलन- संगणक खरेदी.	८५०००/-
४) संबंधित साहित्याचा आढावा – साहित्य स्टेशनरी.	२५०००/-
५) माहिती विश्लेषण - ग्रंथखरेदी.	२५०००/-
६)निष्कर्ष मांडणी.	२५०००/-
७) अहवाललेखन - टंकलेखन.	४५००/-
एकूण	२६००००/-

संदर्भ सूची

- अन्नदाते, अमोल,(२०१९), *हे बोलायलाच हवं.* नेहा कम्प्युटर प्रिंटर्स
- आगलावे, प्रदीप, (२०००),‘*संशोधन पद्धतीशास्त्र आणि तंत्रे’.* विद्या प्रकाशन, :नागपूर.
- आगलावे, प्रदीप, (२००७),‘*भारतीय समाज व्यवस्था व मुल्ये,.* विद्या प्रकाशन, :नागपूर.
- गुरव अनुराधा (१९९७) शालेय कृतिसंशोधन, मेहता पुब्लीकेशन हाउस पुणे – ३०
- दिव्य मराठी सोंडे संध्या नवपालकत्व मधुरिमा १२-०९-२०२३ पान नं.२
- दीक्षित, अंजली, दीक्षित, जगन्नाथ, *लैंगिक शिक्षण.* साकेत प्रकाशन.
- दीक्षित, एन. (२०१५), मानसशास्त्राचे मुलतत्व, निराळी प्रकाशन, पुणे.
- पाटील लीला, (१९८३), आजचे अध्यायन, सुयोग प्रकाशन पुणे.

- पाटील लीला, कुलकर्णी विश्वंभर(1971), *शिक्षणाच्या समस्या.* श्री विद्या प्रकाशन, पुणे.
- प्रजावणी सोंडे संध्या संस्कार मानसी नांदेड १९-०६-२०२५ पान नं. १० www.prajawani.in
- प्रभू विठ्ठल (२०२०), *वयात येताना.* साकेत प्रकाशन, :औरंगाबाद.
- *बालविकास.*(२०२०) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, :पुणे
- लोकमत- *मावळणारे बालपण.* मे न्यूजpub-31-DEC-2018 9:42pm
- शेवाळे एस. बी. (२०१०) किशोरवयीन मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
- Govinda Rao N (2005) Sex Education and Adolescents. Neelkamal Publication, Hyderabad.
- Hurlock E.B. (1973), Adolescent Development, Tata McGraw Hill.
- Santrock, J. W (2011), Adolescence Mc Graw Hill
- Sharma R.A. (2007) Educational Psychology Surya Publication Merath.
- UNFPA (2008). Comprehensive Sexuality Education : Theory and Practice. UNFPA New York.
- Vaghela V.J. (2023) A critical study of psycho sexual problems of teenagers independent author.
- World Health Organisation (2006). Sexuality Education for Adolsecents. Genera WHO

आंतरजाल संदर्भ

- https://vishwakosh.marathi.gov.in/170371 किशोरावस्था बेझंट अनीसेंट
- http://hdl.handle.net 10603/486404 (2016) A study of the effect of anxiety on the aspiration of the secondary level students Mathur Priyanka
- http://health.vikaspedia.in वयात येताना (किशोरावस्था) १/९/२०
- Mr.wikisource.org/wikipidia/पान: मानवी/लैंगिकता एक प्राथमिक ओळख
- pmc.ncbi.nlm.nih.gov Understanding normal development of adolsecent sexuality : A bumpy ride (PMC)